0 Box file

3५८

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## एक्सप्रेस टॉवर्स, ४ था मजला, नरिमन पॉईंट, मुंबई -२१

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/४८५ 	२३ मे, २०१४

### परिपत्रक क्र.१५६

**विषय :** कोऱ्या निविदा संचाचे दर सुधारित करण्याबाबत.

**संदर्भ :** १. मध्यवर्ती कार्यालयाचे दि.१.१०.९४ चे जा.क्र. MWSSB/FA-II/Tender/590/94 चे परिपत्रक

२. ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे दि. ३०.१२.२००८ चे शासन परिपत्रक क्र. झेडपीए-२००८/प्र.क्र.४२८/वित्त-९

विषयांकित प्रकरणी मध्यवर्ती कार्यालयाच्या संदर्भ क्र. १ च्या व सोबत जोडलेल्या संदर्भ क्र. २ च्या शासन परिपत्रकाचे अवलोकन करावे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी मागविण्यात येणाऱ्या निविदांच्या संचाची विक्री करण्याची किंमत किती घेण्यात यावी, याबाबतचे निर्देश संदर्भ क्र. १ च्या दि.१.१०.१९९४ च्या परिपत्रकान्वये क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत. ज्यास सुमारे १९ वर्षांचा कालावधी लोटुन गेला आहे. या २० वर्षांच्या कालावधीत स्टेशनरी, छपाई, बांधणी इ.च्या मूळ दरात बरीच वाढ झालेली आहे. या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. ग्राम विकास व जलसंधारण विभागाने जिल्हा परिषदांतर्गत मागविण्यात येणाऱ्या निविदांच्या किंमती निश्चित करुन त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश सोबत जोडलेल्या दि.३०.१२.०८ च्या शासन परिपत्रक क्र. झेडपीए-२००८/प्र.क्र.४२८/ वित्त-९ अन्वये, जिल्हा परिषदांच्या सर्व कार्यालयांना निर्देश दिले आहेत.

२. ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या सदर दि.३०.१२.०८ च्या शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या अधिनस्त सर्व विभागांना दिले आहेत.

३. मजीप्रांतर्गत अनुसरण्यात येत असलेली बव्हंशी कार्यपध्दती ही सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, परिपत्रके तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहितेनुसार अवलंबिली जाते.

सबब, मजीप्रांतर्गत सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

अ) मजीप्रांतर्गत मागविण्यात येणाऱ्या निविदा संचांची विक्री करताना, आकारावयाचे निविदा संचाचे दर हे, सोबत जोडलेल्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दि. ३०.१२.२००८ च्या शासन परिपत्रक क्र. झेडपीए-२००८/ प्र.क्र.४२८/वित्त-९ अन्वये आकारण्यात यावेत.

ब) निविदा संचाची विक्री करताना मुल्यवर्धित करापोटी (VAT) सद्य:स्थितीतील ५% किंवा त्यावेळेचा जो दर असेल त्याप्रमाणे रक्कम प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

क) सदरचे दर या परिपत्रकाच्या दिनांकापासुन म्हणजेच दिनांक २३ मे, २०१४ पासुन लागु रहातील.

तेव्हा उपरोक्त सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी, आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयांना सदर परिपत्रक आपल्या स्तरावरुन पाठविण्यात यावे व तशी पोहोच त्यांच्याकडुन घेण्यात यावी.

(सोनिया सेठी)
सदस्य सचिव

प्रत : मुख्य अभियंता, (सर्व) मजीप्रा, ठाणे/पुणे/नाशिक/मुंबई यांना माहितीसाठी.
प्रत : संचालक (वित्त), मजीप्रा, नवी मुंबई यांना माहितीसाठी.
प्रत : अधीक्षक अभियंता, (सर्व) मजीप्रा

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मुंबई-२१
रवाना
26 MAY 2014

E:\TS-I - 2014\E-TS- 1-MAY - 2014.DOC/ Jyoti